0001

नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

वाचा :-

१) या कार्यालयाचे दक्षता शाखेकडून दि.१५/१०/२०११ रोजी प्राप्त झालेला अहवाल.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.७१/२०११/जा.८३७ दिनांक २०/१०/२०११, ०४/११/२०११ व २४/११/२०११.

३) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, तुर्भे पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे दि.२४/१०/२०११, १७/११/२०११, व ०२/१२/२०११ रोजीचे टपालामार्फत प्राप्त झालेले लेखी अभिवेदन.

४) मे. एस.बी. रोडलाईन्स कम ट्रान्स्पोर्ट कंपनी यांचे दि.२३/११/२०११ रोजीचे टपालामार्फत प्राप्त झालेले लेखी निवेदन.

५) बी.ए.एस.एफ. कंपनीचे यांचे दि.२३/११/२०११ रोजीचे टपालामार्फत प्राप्त झालेले लेखी निवेदन.

६) टँकर क्र. एमएच-०४-अेएल-९२७१ चा मालक राजबहादुर सिंग, चालक संतोषकुमार श्रीराम यादव व क्लिनर सुभाषचंद्र रामसुमीरण यादव यांचे दि.०१/१२/२०११ रोजी टपालामार्फत प्राप्त झालेले स्वतंत्र लेखी निवेदने.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.७१/२०११/जा 9033
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट, मुंबई - २०.
दिनांक : २७/१२/२०११.

## आदेश

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

### प्रकरणाची पार्श्वभूमी :-

दिनांक १२/१०/२०११ रोजी या कार्यालयाच्या फिरत्या पथकास मिळालेल्या खात्रीलायक बातमीनुसार येथील अधिकारी/कर्मचारी दोन पंचासह बी.ए.एस.एफ. इंडीया लिमीटेड, ठाणे बेलापूर रोड, तुर्भे रेल्वे स्टेशन समोर, नवी मुंबई येथे आले. सदर ठिकाणी खात्रीलायक बातमीच्या अनुषंगाने टँकर क्र. एमएच-०४-अेएल-९२७१ हा डिझेल वितरणासाठी येणार असून सदर टँकर मधून वितरणापूर्वीच डिझेलची काही प्रमाणात चोरी झाली आहे, या बातमीच्या अनुषंगाने अधिकारी पथक पंचासह बी.ए.एस.एफ. कंपनीच्या गेट समोर टँकरची वाट पाहत बसले. साधारण ७:५० वाजताचे सुमारास टँकर क्र. एमएच-०४-अेएल-९२७१ हा बी.ए.एस.एफ. इंडीया लिमीटेड कंपनीच्या गेटमधून आत जात असतांना दिसून आला. अधिकारी पथकाने पंचाना इशारा करुन कंपनीमध्ये टँकरच्या

मागोमाग प्रवेश केला. अधिकारी वर्गाने टँकरचे चालक संतोषकुमार श्रीराम यादव व क्लिनर सुभाषचंद्र रामसुमीरण यादव यांना तसेच बी.ए.एस.एफ. कंपनीचे कर्मचारी यांना स्वत:ची ओळख करुन देऊन भेटीचे कारण सांगितले. त्यानुसार बी.ए.एस.एफ. कंपनीने एच.पी.सी.एल. कंपनीतील विभागीय विक्री व्यवस्थापक श्री. डी. साईकुमार यांना बी.ए.एस.एफ. कंपनीत बोलावून घेतले. कपंनीमधील मास्टर की द्वारे टॅंकरच्या प्रत्येक कप्प्याचा टाळा उघडून डीपद्वारे मोजमाज घेतले असता. पुढील प्रमाणे आढळून आले. कंपनीत घडलेल्या घटना क्रमाचा अहवाल कंपनीकडून घेण्यात आला आहे. टँकरच्या कप्पा क्र. १ मध्ये ४९६६ लिटर डिझेल, कप्पा क्र. २ मध्ये ५००० लिटर डिझेल, कप्पा क्र. ३ मध्ये ४८४५ लिटर डिझेल व कप्पा क्र. ४ मध्ये ४८०५ लिटर डिझेल साठा आढळून आला. म्हणजेच टँकरच्या कप्पा क्र. १ मध्ये ३४ लिटर डिझेल, कप्पा क्र. ३ मध्ये १५५ लिटर डिझेल व कप्पा क्र. ४ मध्ये १९५ लिटर डिझेल असा एकूण मिळून ३८४ लिटर डिझेल साठा कमी आढळून आला. याबाबत अधिकारी पथकाने टँकरचे चालक संतोषकुमार श्रीराम यादव व क्लिनर सुभाषचंद्र रामसुमीरण यादव यांचेकडे विचारणा केली असता. टॅंकरचे चालक याने असे सांगितले की, दिनांक १२/१०/२०११ रोजी टँकर क्र. एमएच-०४-अेएल-९२७१ चे मालक राजबहादूर सिंग यांनी त्याला भ्रमणध्वनीवर संपर्क साधून हिंदूस्थान पेट्रोलियम कार्पोरेशन लि. वाशी टर्मिनस येथील गेटच्या बाहेर बोलावून घेतले. सदरची वेळ साधारण सकाळी ६:०० वाजताची होती. त्यांनी त्याला तेथे उभा असलेला टँकर क्र. एमएच-०४-अेएल-९२७१ हा ताब्यात देऊन व एच.पी.सी.एल. कंपनीतून देण्यात आलेला डी.ओ.सी. क्र. ११०२२८०३ अे १ या चलनाची प्रत देऊन बी.ए.एस.एफ. इंडीया लिमीटेड, ठाणे बेलापूर रोड, तुर्भे रेल्वे स्टेशन समोर, नवी मुंबई येथे खाली करण्यासाठी घेऊन जाण्यांस सांगितले. सदर ठिकाणी अधिकाऱ्यांनी त्याच्या टँकरमधील प्रत्येक कप्प्याचे मोजमाप घेतले असता, कप्पा क्र. १ मध्ये ३४ लिटर डिझेल, कप्पा क्र. ३ मध्ये १५५ लिटर डिझेल व कप्पा क्र. ४ मध्ये १९५ लिटर डिझेल असा एकूण मिळून ३८४ लिटर डिझेल साठा कमी आढळून आला. सदरचा टँकर एस.बी. रोडलाईन्स यांनी दिनांक ११/१०/२०११ रोजी रात्री ८:०० वाजताच्या दरम्यान भरला असून दिनांक १२/१०/२०११ रोजी सकाळी ६:०० वाजता त्याचे ताब्यात दिल्या नंतर तो टँकर खाली करणेकरिता बी.ए.एस.एफ. कंपनीत आला. टँकरमध्ये आढळून आलेल्या ३८४ लिटर डिझेलच्या कमी साठ्याबाबत त्याला काही माहिती नाहीं, असे सांगितले. याचप्रमाणे टँकरचा क्लिनरने देखील वरीलप्रमाणे सांगितले असून दोघांचाही जबाब पंचासमक्ष नोंदवून घेण्यात आला आहे.

दरम्यानच्या कालावधीत उपस्थित अधिकाऱ्यांनी तुर्भे पोलिस ठाणे येथे संपर्क साधून घटनेची माहिती दिली. त्यानुसार संबंधित पोलिस ठाणे येथील पोलिस नाईक श्री. विनायक कृष्णा मेळावणे (ब.क्र २१५९) हे घटनास्थळी हजर झाले. अधिकाऱ्यांनी त्यांना मुद्देमाल व आरोपी दाखवून घटनेची हकिकत सांगितली. तसेच सदरचा जप्त मुद्देमाल पोलिसांच्या ताब्यात देवून जतन करुन ठेवण्याचे सुचना दिल्या.

अशाप्रकारे उपरोक्त सर्व संबंधितांनी संगणमत करुन हिंदूस्थान पेट्रोलियम कार्पोरेशन लि., वाशी टर्मिनस येथून डिझेलचा टँकर भरुन घेतल्यानंतर पूर्णपणे खाली करण्यासाठी आणण्याची सर्वस्वी जबाबदारी त्यांचेवर असून सुध्दा प्रत्यक्षात तसे न करता दरम्यानच्या कालावधीत डिझेलच्या टँकरमधून बेकायदेशिररित्या डिझेलची चोरी केल्याचे निष्पन्न झाल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द (१) जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७, ८ तसेच (२) दि मोटार स्पिरीट ॲन्ड हायस्पीड डिझेल (रेग्युलेशन ऑफ सप्लाय डिस्ट्रिब्युशन ॲण्ड प्रिव्हेशन ऑफ मालप्रॅक्टीसेस) आदेश २००५ चे कलम ३, ४, ५ व ६ चा भंग केल्यावरुन त्यांचेविरुध्द तुर्भे पोलिस ठाणे, नवी मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ३४३५/२०११, दि.१२/१०/२०११ अन्वये गुन्हा नोंद करुन खालील मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच जप्त साठयातून पंचासमक्ष नमुने घेण्यात आले.

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | टँकर क्र. एमएच-०४-अेएल-९२७१ | १ नग | १२,००,०००/- |
| २ | उक्त टँकरमधील डिझेल साठा | १९६१६ लि. | ८,६९,७६०/- |
| ३ | टँकरमधील पितळी डिप | १ नग | २,०००/- |
| | | एकूण | २०,७१,७६०/- |

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप (अंमल), मुंबई यांनी केलेली असून, तुर्भे पोलिस ठाणे, नवी मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ३४३५/२०११, दि.१२/१०/२०११ मध्ये जप्त करण्यात आलेला उपरोक्त मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये ? याबाबत वाचा क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सर्व संबंधितांना कारणे दाखवा नोटीस बजावून त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात आली असून त्याकरीता या कार्यालयात दि. २५/१०/२०११ रोजी सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक २५/१०/२०११ रोजीच्या सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तसेच आरोपी/अपचारी यापैकी कोणीही उपस्थित राहिले नाहीत. सबब, पुढील सुनावणी दि.१८/११/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक १८/११/२०११ रोजीच्या सुनावणीस एच.पी.सी.एल. कंपनीतील विभागीय विक्री व्यवस्थापक श्री. डी. साईकुमार, बी.ए.एस.एफ. कंपनीचे वेअर हाऊस मॅनजर श्री. पुष्पेंदु भट्टाचार्य, सहाय्यक व्यवस्थापक श्री उदय पाटील, एस.बी. रोडलाईन्सचे मालक मथुरा प्रसाद वर्मा, टँकर क्र. एमएच-०४-अेएल-९२७१ चा मालक राजबहादूर सिंग, चालक संतोषकुमार यादव हे उपस्थित राहिले व त्यांनी त्यांचे लेखी निवेदन सादर करण्यासाठी सुनावणीची पुढील तारीख मिळण्यास विनंती केली. सदर सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तसेच इतर आरोपी/अपचारी उपस्थित राहिले नाहीत. सबब, पुढील सुनावणी दि. २९/११/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक २९/११/२०११ रोजीच्या सुनावणीस एस.बी. रोडलाईन्सचे मालक मथुरा प्रसाद वर्मा हे उपस्थित राहिले व त्यांनी यापूर्वीच वाचावे क्र. ४ अन्वये टपालामार्फत लेखी निवेदन सादर केल्याचे सांगितले. सदर सुनावणीस टँकर क्र. एमएच-०४-एएल-९२७१ चा चालक सुभाषचंद्र रामसुमीरण यादव हे उपस्थित राहिले. सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तसेच इतर आरोपी/अपचारी यांना पुरेशी संधी देऊन देखील ते सुनावणीस उपस्थित राहिले नाहीत.

सबब, प्रकरण गुणवत्तेच्या आधारे निर्णयास्तव राखीव ठेवण्यात आले.

युक्तीवाद :-

वरिष्ठ पोलिस निरिक्षक, तुर्भे पोलिस ठाणे यांनी दि.२४/१०/२०११ रोजी टपालामार्फत सादर केलेल्या लेखी अभिवेदनात, सदर गुन्ह्यामध्ये आरोपी नामे संतोषकुमार श्रीराम यादव, सुभाषचंद्र रामसुमिरन यादव यांना दिनांक १२/१०/२०११ रोजी व मथुराप्रसाद रामदेव वर्मा, राजबहादुर सभाजित सिंह यांना दि.२२/१०/२०११ रोजी अटक करण्यात आलेली आहे. तसेच अटक आरोपी राजबहादुर सभाजित सिंह (टँकर मालक) यांनी स्वखुशीने निवेदन देवून सदर गेला माल ३८४ लिटर डिझेल हे जप्त टँकरच्या डिझेल टाकीतच टाकलेले असलेबाबत सांगितले असल्याने तसा त्यांचा दोन पंचासमक्ष सविस्तर पंचनामा नोंद करण्यात आला असून गुन्ह्यातील गेले माला पैकी अंदाजे ३०० लिटर डिझेल जप्त करण्यात आले आहे. गुन्ह्यातील जप्त टँकर क्र. एमएच-०४-एएल-९२७१ यांची डिझेल टाकी ही गळत असून त्यातून बरचसे डिझेल हे जमिनीवर पडून नाश झालेले असल्याने गेले मालापैकी उर्वरित ८४ लि. डिझेल जप्त करता आले नाही. तसेच गुन्ह्यातील सर्व अटक आरोपीत हे सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत. सदर गुन्ह्यातील सर्व जप्त मुद्देमाल तुर्भे पोलिस ठाण्यात जमा आहे. तसेच जप्त मालापैकी टँकर क्र. एमएच-०४-एएल-९२७१ याची डिझेल टाकी ही गळत असून त्यातून बरेचसे डिझेल हे जमिनीवर पडून नाश झालेले असुन ते सदर ठिकाणी जमिनीवर पसरलेले आहे. तरी सदर डिझेल हे ज्वलनशिल असल्यामुळे अधिक काळ पोलिस ठाण्यात ठेवणे धोक्याचे आहे. त्यामुळे सदर मुद्देमालाची त्वरीत प्रभावाने निर्गती होणेस विनंती आहे, असे नमूद केले आहे. तसेच दि.१७/११/२०११ व दि. ०२/१२/२०११ रोजीच्यां लेखी अभिवेदनात, सदर गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल हा सदर मालाबाबतचे योग्य पुरावादर्शक कागदपत्रांची पडताळणी करुन त्याचे योग्य मालकाचे ताब्यात देण्यात यावा. तसेच सदर मालाबाबत कोणतीही पुरावादर्शक कागदपत्र हजर न केल्यास तो सरकारजमा करण्यात यावा, तसेच सदर डिझेल हे ज्वलनशिल असल्यामुळे अधिक काळ पोलिस ठाण्यात ठेवणे धोक्याचे आहे. त्यामुळे सदर मुद्देमालाची त्वरीत प्रभावाने निर्गती होणेस विनंती आहे असे नमूद केले आहे.

एस. बी. रोडलाईन्सचे मालक यांचे दि.२३/११/२०११ रोजी टपालामार्फत सादर केलेल्या निवेदनात, ही 1005
सम्राट सोसायटी, प्लॉट क्र. १२, रुम क्र. १०३, सेक्टर ७, कोपरखैराणे, नवी मुंबई या पत्त्यावर ट्रान्सपोर्टचा व्यवसाय मे. एस.बी. रोडलाईन्स कम ट्रान्सपोर्ट कंपनीच्या नावाने करत आहेत. ट्रान्सपोर्टच्या व्यवसायासाठी भाडयाने टँकर घेऊन एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी माल पोहचविण्याचे काम करत असतो. आपण काढलेल्या कारणे दाखवा नोटीसप्रमाणे व नेहमीप्रमाणे दिनांक ११/१०/२०११ रोजी टँकर क्र. एमएच-०४-एएल-९२७१ हा भाड्याने घेवून टँकरचे मालक श्री. राज बहादुर सिंग यांना २०,००० लिटर डिझेल एच.पी.सी.एल. वाशी या ठिकाणाहून बी.एस.एफ. तुर्भे या ठिकाणी उतरविण्यास सांगितले व त्यांचे टँकर भाडेही निश्चित करण्यात आले व टँकरचे मालक श्री. राज बहादुर सिंग यांनी सदरचे डिझेल एच.पी.सी.एल. वाशी या ठिकाणी भरुन बी.एस.एफ. तुर्भे या ठिकाणी उतरविण्याची हमी दिल्यामुळे सदरचे माल सप्लायचे काम टँकरचे मालक श्री. राज बहादुर सिंग यांना देण्यात आले. सदरच्या टँकरचे मालक श्री. राज बहादुर सिंग यांनी त्यांच्या टँकरमधून २०,००० लिटर डिझेल वाहून घेवून जाणेसाठी टँकरचे चालक श्री. संतोष कुमार यादव व क्लिनर श्री. सुभाषचंद्र यादव यांना नेमले होते. दरम्यानच्या काळात आपल्या फिरत्या पथकाने सदरच्या टँकरमधील डिझेल कमी आढळले म्हणून सदरचा टँकर जप्त केला आहे. सदरच्या प्रकरणात त्यांचा सहभाग फक्त ट्रान्सपोर्ट व्यवसायाचा असून प्रत्यक्षात एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी माल वाहतूक करण्याची जबाबदारी टँकरचे मालक व ड्रायव्हर इत्यादींची असते. त्यामध्ये त्यांच्या कंपनीतर्फे कोणाचाही हस्तक्षेप होत नाही किंवा हस्तक्षेप करण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. सदरच्या टँकरमध्ये डिझेल कमी निघाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी टँकरचे मालक व ड्रायव्हर यांची असते, असा त्यांच्या व्यवसायाचा नियम आहे. सदरच्या प्रकरणात पोलीस तपासात आमचे कंपनीचा हस्तक्षेप असल्याचे निष्पन्न झाले नाही. सदरचा टँकर व त्यातील माल ड्रायव्हरच्या जबाबदारीवर असल्याने त्यातील माल कमी निघणे याला टँकरचे मालक व ड्रायव्हर जबाबदार असतील त्यामुळे आम्ही किंवा आमचे कंपनीने कसल्याही प्रकारचा गुन्हा केलेला नाही व त्यात आम्ही निर्दोष आहोत. आपण जप्त केलेला डिझेलचा साठा (मुद्देमाल) हा आमचे कंपनीला ज्या कंपनीकडून घेतला आहे त्या कंपनीत परत करावयाचा आहे व तसे न केल्यास सदरची कंपनी आमचे कंपनीकडून सदरचा डिझेलचा साठा (मुद्देमाल) वसुल करण्यासाठी आमच्या कंपनीवर कायदेशीर कार्यवाही करु शकते व तसे झाल्यास आमच्या कंपनीचे अतोनात आर्थिक नुकसान होण्याची शक्यता आहे म्हणून तसा डिझेलचा साठा (मुद्देमाल) आम्हाला परत केल्यास आमच्या दृष्टीकोनातुन खुपच योग्य होणार आहे व त्यासाठी आवश्यकता भासल्यास तेवढया रकमेची हमी देखील आमच्या द्वारे आपल्याकडे देण्यास आम्ही तयार आहोत. तरी वरील नमुद डिझेलचा साठा परत करावा असे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

0006 बी.ए.एस.एफ. कंपनी यांचे दिनांक २३/११/२०११ रोजी टपालामार्फत सादर केलेल्या लेखी निवेदनात, त्यांच्या कंपनीने एच.पी.सी.एल. कंपनीमधुन खरेदी केलेला हायस्पिड डिझेलच्या साठयाबाबत त्यांना दिनांक १२/१०/२०११ रोजी रेशनिंग इन्स्पेक्टर यांनी त्यांच्या कंपनीस भेट देवून सदर टँकरमधील हायस्पिड डिझेलचा साठा कमी असल्याबाबत सांगितले. निवेदनासोबत त्यांनी पेट्रोलियम पदार्थाचे क्लास बी व सी, विस्फोटक परवाना तसेच शिधावाटप विभागाच्या अनुज्ञाप्तीची छायांकित प्रत सादर करुन त्यांनी यापुर्वीच त्यांच्या सप्लायर यांना नव्याने डिझेलसाठयाचे वितरण करण्याबाबत सुचना दिलेल्या असल्याने जप्त करण्यात आलेल्या टँकरमधील डिझेल साठयाची त्यांना आवश्यकता नाही असे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

टँकर क्र. एमएच-०४-अेएल-९२७१ चा मालक राजबहाद्दुर सिंग यांचे दिनांक १/१२/२०११ रोजीच्या लेखी निवेदनात, मी टँकर क्र. एमएच-०४-अेएल-९२७१ ही गाडी माझे नावावर असुन दिनांक ११/१०/२०११ रोजी ड्रायव्हर संतोष कुमार यादव व क्लिनर सुभाषचंद्र यादव यांनी ऑर्डर मिळाल्यानंतर हिंदुस्थान पेट्रोलियम कंपनीतुन २०,००० लिटर डिझेल स्वत: भरुन घेतले आणि दिनांक १२/१०/२०११ रोजी आलेल्या डि.ओ.सी. क्र ११०२२८०३ ए ४१ या चलनाची प्रत घेऊन बी.ए.एस.एफ इंडिया लिमिटेड, ठाणे बेलापुर रोड, तुर्भे रेल्वे स्टेशन समोर नवी मुंबई येथे गाडी खाली करण्यास आली. सदर ठिकाणी आपल्या फिरत्या पथकाने बी.ए.एस.एफ कंपनीच्या आवारात टँकर उभा असतांना पकडला. तपासणीअंती टँकरमध्ये डिझेल कमी आढळले म्हणून सदर टँकर जप्त करण्यात आला तेंव्हा असे माहित पडले की, सर्व कप्प्यांमध्ये मिळून ३८४ लिटर डिझेल कमी होते. आम्हाला याबाबत कोणतीही माहिती नव्हती. टँकरचे ड्रायव्हर व क्लिनर या दोघांनी मिळून हा माल काढला असेल अशी मला शक्यता आहे. या प्रकरणात माझा कोणत्याही प्रकारे समावेश नव्हता. त्यामुळे टँकरमध्ये जो माल राहिलेला आहे १९६१६ लिटर डिझेल ते हिंदुस्थान पेट्रोलियम कंपनीला परत करण्यात यावा आणि मला माझा टँकर परत मिळावा. या सर्व प्रकरणात मला जबाबदार धरण्यात येवू नये असे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

टँकर क्र. एमएच-०४-अेएल-९२७१ चा चालक संतोषकुमार श्रीराम यादव यांचे दिनांक १/१२/२०११ रोजीच्या लेखी निवेदनात, मी टँकर क्र. एमएच-०४-अेएल-९२७१ चा या गाडीवर ड्रायव्हर म्हणून होतो. गाडीचे मालक श्री राजबहादुर सिंग यांनी दिनांक १२/१०/२०११ रोजी मला भ्रमणध्वनीवरुन संपर्क साधुन हिंदुस्थान पेट्रोलियम कं. लि. वाशी टर्मिनल येथील बाहेर गेटवर बोलावून घेतले. सदरची वेळ सकाळी ६ वाजताची होती. त्यांनी मला हे टँकर ताब्यात देवून एच.पी.सी.एल. कंपनीतुन देण्यात आलेल्या डि.ओ.सी. क्र ११०२२८०३ ए ४१ या चलनाची प्रत देवून बीएएसएफ इंडीया लि., ठाणे बेलापुर रोड, तुर्भे रेल्वे स्टेशन समोर, नवी मुंबई येथे खाली करण्यास सांगितले. सदर ठिकाणी आपल्या फिरत्या पथकाने बीएएसएफ कंपनीच्या आवारात टँकर उभा होता. डिझेल कमी आढळले म्हणून सदर टँकर जप्त करण्यात आला तेंव्हा आम्हाला माहित पडले की सर्व कप्प्यांमध्ये

मिळून ३८४ लिटर डिझेल कमी होते. आम्हाला याबाबत कोणतीही माहिती नव्हती. टँकरचे मालक श्री राजबहादुर सिंगने हे टँकर भरुन आमचे ताब्यात दिले होते. याप्रकरणी आमचा काहीही हात नाही. त्यामुळे कृपया या सर्व प्रकरणात आम्हाला जबाबदार धरण्यात येवू नये असे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

टँकर क्र. एमएच-०४-अेएल-९२७१ चा क्लिनर सुभाषचंद्र रामसुमीरण यादव यांचे दिनांक १/१२/२०११ रोजीच्या लेखी निवेदनात, टँकर क्र. एमएच-०४-अेएल-९२७१ या गाडीवर मी क्लिनर म्हणून होतो. गाडीचे मालक श्री राजबहादुर सिंग यांनी दिनांक १२/१०/२०११ रोजी ड्रायव्हरला भ्रमणध्वनीवरुन संपर्क साधून हिंदुस्थान पेट्रोलियम कं. लि. वाशी टर्मिनल येथील बाहेर गेटवर बोलावून घेतले. सदरची वेळ सकाळी ६ वाजताची होती. त्यांनी ड्रायव्हरच्या हा टँकर ताब्यात देवून एच.पी.सी.एल. कंपनीतुन देण्यात आलेल्या डि.ओ.सी. क्र ११०२२८०३ ए ४१ या चलनाची प्रत देवून बीएएसएफ इंडीया लि., ठाणे बेलापुर रोड, तुर्भे रेल्वे स्टेशन समोर, नवी मुंबई येथे खाली करण्यास सांगितले. आणी हा टँकर खाली केल्यानंतर मला १०० रु देईन असे सांगितले. सदर ठिकाणी आपल्या फिरत्या पथकाने बीएएसएफ कंपनीच्या आवारात टँकर उभा असतांना पकडला तपासणीअंती टँकरमध्ये डिझेल कमी आढळले म्हणून सदर टँकर जप्त करण्यात आला तेंव्हा आम्हाला माहित पडले की सर्व कप्प्यांमध्ये मिळून ३८४ लिटर डिझेल कमी होते. आम्हाला याबाबत कोणतीही माहिती नव्हती. टँकरचे मालक श्री राजबहादुर सिंगने हे टँकर भरुन आमचे ताब्यात दिले होते. याप्रकरणी आमचा काहीही हात नाही. त्यामुळे कृपया या सर्व प्रकरणात आम्हाला जबाबदार धरण्यात येवू नये असे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

<u>निष्कर्ष</u>

प्रस्तुत प्रकरणातील आरोपी/अपचारी यांचा युक्तिवाद, निवेदन, अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तुत प्रकरणी, दिनांक १२/१०/२०११ रोजी या कार्यालयाच्या फिरत्या पथकास मिळालेल्या खात्रीलायक बातमीनुसार येथील अधिकारी / कर्मचारी दोन पंचासह बी.ए.एस.एफ. इंडीया लिमीटेड, ठाणे बेलापूर रोड, तुर्भे रेल्वे स्टेशन समोर, नवी मुंबई येथे आले. सदर ठिकाणी खात्रीलायक बातमीच्या अनुषंगाने टँकर क्र. एमएच-०४-अेएल-९२७१ हा डिझेल वितरणासाठी येणार असून सदर टँकर मधून वितरणापूर्वीच डिझेलची काही प्रमाणात चोरी झाली आहे, या बातमीच्या अनुषंगाने पथकाने सुमारे ७:५० वाजता टँकर क्र. एमएच-०४-अेएल-९२७१ हा बी.ए.एस.एफ. इंडीया लिमीटेड कंपनीच्या गेटमधून आत जात असतांना अधिकारी पथकाने पंचाना इशारा करुन कंपनीमध्ये टँकरच्या मागोमाग प्रवेश करुन टँकरचे चालक संतोषकुमार श्रीराम यादव व क्लिनर सुभाषचंद्र रामसुमीरण यादव यांना तसेच बी.ए.एस.एफ. कंपनीचे कर्मचारी यांना स्वतःची ओळख करुन देऊन

बी.ए.एस.एफ. कंपनीने एच.पी.सी.एल. कंपनीतील विभागीय विक्री व्यवस्थापक श्री. डी. साईकुमार यांना बी.ए.एस.एफ. कंपनीत बोलावून घेतले. कपंनीमधील मास्टर की द्वारे टॅंकरच्या प्रत्येक कप्प्याचा टाळा उघडून डीपद्वारे मोजमाप घेतले असता. टॅंकरच्या कप्पा क्र. १ मध्ये ४९६६ लिटर डिझेल, कप्पा क्र. २ मध्ये ५००० लिटर डिझेल, कप्पा क्र. ३ मध्ये ४८४५ लिटर डिझेल व कप्पा क्र. ४ मध्ये ४८०५ लिटर डिझेल साठा आढळून आला. म्हणजेच टॅंकरच्या कप्पा क्र. १ मध्ये ३४ लिटर डिझेल, कप्पा क्र. ३ मध्ये १५५ लिटर डिझेल व कप्पा क्र. ४ मध्ये १९५ लिटर डिझेल असा एकूण मिळून ३८४ लिटर डिझेल साठा कमी आढळून आला. याबाबत अधिकारी पथकाने टॅंकरचे चालक संतोषकुमार श्रीराम यादव व क्लिनर सुभाषचंद्र रामसुमीरण यादव यांचेकडे विचारणा केली असता. टॅंकरचे चालक याने असे सांगितले की, दिनांक १२/१०/२०११ रोजी टॅंकर क्र. एमएच-०४-अेएल-९२७१ चे मालक राजबहादूर सिंग यांनी त्याला भ्रमणध्वनीवर संपर्क साधून हिंदूस्थान पेट्रोलियम कार्पोरेशन लि. वाशी टर्मिनस येथील गेटच्या बाहेर बोलावून घेतले. सदरची वेळ साधारण सकाळी ६:०० वाजताची होती. त्यांनी त्याला तेथे उभा असलेला टॅंकर क्र. एमएच-०४-अेएल-९२७१ हा ताब्यात देऊन व एच.पी.सी.एल. कंपनीतून देण्यात आलेला डी.ओ.सी. क्र. ११०२२८०३ अे १ या चलनाची प्रत देऊन बी.ए.एस.एफ. इंडीया लिमीटेड, ठाणे बेलापूर रोड, तुर्भे, रेल्वे स्टेशन समोर, नवी मुंबई येथे खाली करण्यासाठी घेऊन जाण्यांस सांगितले. सदरचा टॅंकर एस.बी. रोडलाईन्स यांनी दिनांक ११/१०/२०११ रोजी रात्री ८:०० वाजताच्या दरम्यान भरला असून दिनांक १२/१०/२०११ रोजी सकाळी ६:०० वाजता त्याचे ताब्यात दिल्या नंतर तो टॅंकर खाली करणेकरिता बी.ए.एस.एफ. कंपनीत आला. टॅंकरमध्ये आढळून आलेल्या ३८४ लिटर डिझेलच्या कमी साठ्याबाबत त्याला काही माहिती नाही, असे सांगितले. याचप्रमाणे टॅंकरचा क्लिनरने देखील वरीलप्रमाणे सांगितले असून दोघांचाही जबाब पंचासमक्ष नोंदवून घेण्यात आला आहे. अशाप्रकारे सदर टॅंकर व त्यामधील डिझेलचा साठा जप्त करण्यात आला.

प्रस्तुत प्रकरणी टॅंकर क्र. एमएच-०४-अेएल-९२७१ चा मालक राजबहादुर सिंग सुनावणीचे वेळी केलेल्या खुलाशात, दिनांक ११/१०/२०११ रोजी ड्रायव्हर संतोष कुमार यादव व क्लिनर सुभाषचंद्र यादव यांनी ऑर्डर मिळाल्यानंतर हिंदुस्थान पेट्रोलियम कंपनीतुन २०,००० लिटर डिझेल स्वत: भरुन घेतले आणि दिनांक १२/१०/२०११ रोजी आलेल्या डि.ओ.सी. क्र ११०२२८०३ ए ४१ या चलनाची प्रत घेऊन बी.ए.एस.एफ इंडिया लिमिटेड, ठाणे बेलापुर रोड, तुर्भे रेल्वे स्टेशन समोर नवी मुंबई येथे गाडी खाली करण्यास गेले असता कंपनीचे आवारामध्ये तपासणीअंती टॅंकरमध्ये सर्व कप्यांमध्ये मिळून ३८४ लिटर डिझेल कमी आढळले म्हणून सदर टॅंकर जप्त करण्यात आला याबाबत त्यांना कोणतीही माहिती नव्हती. टॅंकरचे ड्रायव्हर व क्लिनर या दोघांनी मिळून हा माल काढला असेल अशी त्यांना शक्यता आहे.तसेच या प्रकरणात त्यांचा कोणत्याही प्रकारे समावेश नाही असे सांगितले.

तथापी, टँकर क्र. एमएच-०४-अेएल-९२७१ चा चालक संतोषकुमार श्रीराम यादव व क्लिनर सुभाषचंद्र रामसुमीरण यादव यांनी घटनास्थळी पंचांसमक्ष दिलेल्या लेखी जबाबामध्ये गाडीचे मालक श्री राजबहादुर सिंग यांनी दिनांक १२/१०/२०११ रोजी त्यांना भ्रमणध्वनीवरुन संपर्क साधुनं हिंदुस्थान पेट्रोलियम कं. लि. वाशी टर्मिनल येथील बाहेर गेटवर सकाळी ६ वाजता बोलावून घेतले. व टँकर भरुन ताब्यात देवून एच.पी.सी.एल. कंपनीतुन देण्यात आलेल्या डि.ओ.सी. क्र ११०२२८०३ ए ४१ या चलनाची प्रत देवून बीएएसएफ इंडीया लि., ठाणे बेलापुर रोड, तुर्भे रेल्वे स्टेशन समोर, नवी मुंबई येथे खाली करण्यास सांगितले. सदर ठिकाणी फिरत्या पथकाने बीएएसएफ कंपनीच्या आवारात टँकरची तपासणी केली असता त्यामध्ये सर्व कप्प्यांमध्ये मिळून ३८४ लिटर डिझेल कमी आढळले म्हणून सदर टँकर जप्त करण्यात आला याबाबत त्यांना कोणतीही माहिती नव्हती असे सांगुन तसे लेखी निवेदनातही नमुद केले आहे.

एस. बी. रोडलाईन्सचे मालक मथुराप्रसाद वर्मा यांनी सुनावणीच्या वेळी केलेल्या खुलाशात, त्यांनी दिनांक ११/१०/२०११ रोजी टँकरचे मालक श्री. राज बहादुर सिंग यांना सदरचे डिझेल एच.पी.सी.एल. वाशी या ठिकाणी भरुन बी.एस.एफ. तुर्भे या ठिकाणी उतरविण्याची हमी दिल्यामुळे त्यांना टँकरचे भाडे निश्चित करुन सदरचे माल सप्लायचे काम देण्यात आले. दरम्यानच्या काळात फिरत्या पथकाने सदरच्या टँकरमधील डिझेल कमी आढळले म्हणुन सदरचा टँकर जप्त केला आहे. सदरच्या प्रकरणात त्यांचा सहभाग नसुन एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी माल वाहतूक करण्याची तसेच सदरच्या टँकरमध्ये डिझेल कमी निघाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी टँकरचे मालक यांची असते.

प्रस्तुत प्रकरणी सदर गुन्हयामध्ये जप्त करण्यात आलेल्या टँकर क्र. एमएच-०४-अेएल-९२७१ चे मालक राजबहादुर सभाजीत सिंग यांनी सुनावणीचे वेळी सादर केलेले निवेदन मोघम स्वरुपाचे व दिशाभुल करणारे असुन पोलिसांनी टँकर क्र. एमएच-०४-अेएल-९२७१ चे मालक राजबहादुर सभाजित सिंह यांना प्रस्तुत गुन्हयामध्ये दि.२२/१०/२०११ रोजी अटक केल्यानंतर राजबहादुर सभाजित सिंह यांनी स्वखुशीने निवेदन देवून जप्त करण्यात आलेल्या टँकरमधील कमी आढळून आलेला ३८४ लिटर डिझेलचा साठा त्यांनी त्यांच्या जप्त टँकरच्या डिझेल टाकीतच टाकले असलेबाबत पंचासमक्ष मान्य करुन त्यापैकी अंदाजे ३०० लिटर डिझेलचा साठा पोलिसांनी जप्त केला आहे. यावरुन टँकर क्र. एमएच-०४-अेएल-९२७१ चे मालक राजबहादुर सभाजीत सिंग यांचा सदर गुन्हयात प्रत्यक्ष सहभाग असुन त्यांनी एच.पी.सी.एल. कंपनीमधुन डिझेलचा साठा भरुन नियोजीत ठिकाणी न नेता त्यांनी अनधिकृतपणे टँकरमधुन डिझेलचा साठा काढून गैरकृत्य केल्याचे तसेच पर्यायाने उपभोक्ताचे फसवणूक केल्याचे सिध्द होत आहे. सबब, जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६ (अ)(क) मधील तरतुदीनुसार सदरचा जप्त करण्यात आलेला टँकर क्र. एमएच-०४-अेएल-९२७१ हा त्याच्या बाजारमुल्या एवढी रक्कम भरण्यास टँकरचे

मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरचा टँकर त्याच्या मालकास परत करण्याच्या अथवा टँकर मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास या टँकरची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी एस. बी. रोडलाईन्सचे मालक मथुराप्रसाद वर्मा यांनी केलेल्या खुलाशात, सदरच्या प्रकरणात त्यांचा सहभाग नसुन एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी माल वाहतूक करण्याची जबाबदारी टँकरचे मालक यांची असते. जप्त केलेला डिझेलचा साठा (मुद्देमाल) हा त्यांच्या कंपनीला ज्या कंपनीकडून घेतला आहे त्या कंपनीत परत करावयाचा आहे व तसे न केल्यास सदरची कंपनी त्यांच्या कंपनीकडून सदरचा डिझेलचा साठा (मुद्देमाल) वसुल करण्यासाठी त्यांच्या कंपनीवर कायदेशीर कार्यवाही करु शकते व तसे झाल्यास त्यांच्या कंपनीचे अतोनात आर्थिक नुकसान होण्याची शक्यता आहे म्हणून तसा डिझेलचा साठा (मुद्देमाल) त्यांना परत करावे असे नमुद केले आहे.

बी.ए.एस.एफ. या कंपनीच्या वतीने केलेल्या खुलाशात, त्यांनी एच.पी.सी.एल. कंपनीमधुन खरेदी केलेला हायस्पिड डिझेलच्या साठयाबाबत त्यांना दिनांक १२/१०/२०११ रोजी रेशनिंग इन्स्पेक्टर यांनी त्यांच्या कंपनीस भेट देवून सदर टँकरमधील हायस्पिड डिझेलचा साठा कमी असल्याबाबत सांगितले. तसेच त्यांनी यापुर्वीच त्यांच्या सप्लायर यांना नव्याने डिझेलसाठयाचे वितरण करण्याबाबत सुचना दिलेल्या असल्याने जप्त करण्यात आलेल्या टँकरमधील डिझेल साठयाची त्यांना आवश्यकता नाही असे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

प्रकरणी टँकर क्र. एमएच-०४-एएल-९२७१ मधील जप्त करण्यात आलेला १९६१६ लिटर हायस्पीड डिझेलचा साठा हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि., वाशी, नवी मुंबई येथून इन्व्हाईस क्र. ११०२२८०३ दि.११/१०/२०११ अन्वये बी.ए.एस.एफ इंडिया लिमिटेड, ठाणे बेलापुर रोड, तुर्भे रेल्वे स्टेशन समोर नवी मुंबई यांना २०००० लिटर हायस्पीड डिझेलचा साठा पुरवठा करण्याकरिता भरले होते. तथापि, टँकर मालक यांनी स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी सदरचा टँकर नियोजीत स्थळी न नेता त्यांनी अनधिकृतपणे टँकरमधुन डिझेलचा साठा काढून गैरकृत्य केल्याचे तसेच पर्यायाने उपभोक्ताचे फसवणूक केल्याचे सिध्द होत आहे. सबब, सदरहू टँकर मधील संपूर्ण हायस्पीड डिझेलचा साठा ज्या कंपनी मधून भरण्यात आला होता त्या हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि., वाशी, नवी मुंबई यांना परत करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी पोलिसांनी टँकर क्र. एमएच-०४-एएल-९२७१ चे मालक राजबहादुर सभाजित सिंह यांना प्रस्तुत गुन्हयामध्ये दि.२२/१०/२०११ रोजी अटक केल्यानंतर राजबहादुर सभाजित सिंह यांनी स्वखुशीने निवेदन देवून जप्त करण्यात आलेल्या टँकरमधील कमी आढळून आलेला ३८४ लिटर डिझेलचा साठा त्यांनी त्यांच्या जप्त टँकरच्या डिझेल टाकीतच टाकले असलेबाबत पंचासमक्ष मान्य करुन त्यापैकी अंदाजे ३०० लिटर डिझेलचा साठा

पोलिसांनी जप्त केला आहे. टँकर क्र. एमएच-०४-अेएल-९२७१ चे मालक राजबहादुर सभाजित सिंह यांनी अनधिकृतरित्या मिळवलेला तसेच पोलिसांनी जप्त केलेला सदरचा ३०० लिटर डिझेलचा अवैध साठा व धाडीच्या वेळी घटनास्थळी मिळून आलेला पितळी डिप इ. शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई मला जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये तुर्भे पोलिस ठाणे, नवी मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ३४३५/२०११, दि.१२/१०/२०११ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

**आदेश :-**

१) जप्त करण्यात आलेला टँकर क्र. एमएच-०४-अेएल-९२७१ हा शासनजमा करण्यात येत आहे. सदर टँकरच्या बाजारमुल्या एवढी संपुर्ण रक्कम भरण्यास टँकरचा मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरचा टँकर त्याच्या मालकास परत करण्यात यावा व सदर रक्कम शासनजमा करावी. तथापी, अशी कार्यवाही करण्यापूर्वी टँकरच्या मालकीबाबत परिवहन विभागाच्या अभिलेखानुसार पोलीसांनी खातरजमा करावी.

२) अथवा टँकरचा मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास या टँकरची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी. तथापी, सदरचे टँकर लिलाव करण्यापूर्वी या कार्यालयास तसे लेखी सुचीत करावे.

३) जप्त करण्यात आलेल्या टँकरमधील संपुर्ण डिझेलचा साठा, ज्या कंपनीमधून भरलेला आहे त्या हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि., वाशी टर्मीनस, नवी मुंबई यांच्याकडे क्षतीपुर्ती बंधपत्र घेऊन पोलीसांनी परत करावा.

४) टँकरच्या इंधनाच्या टाकीमधुन जप्त करण्यात आलेला ३०० लिटर डिझेलचा साठा शासनजमा करण्यात यावा. सदर डिझेल साठ्याची पोलीसांनी किरकोळीने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

५) घटनास्थळी जप्त करण्यात आलेले पितळी डिप शासनजमा करण्यात यावी. सदर वस्तूंची पोलिसांनी किरकोळीने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

0012 वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) टँकर क्र. एमएच-०४-अेएल-९२७१ चा चालक, संतोषकुमार श्रीराम यादव
२) टँकर क्र. एमएच-०४-अेएल-९२७१ चा क्लिनर, सुभाषचंद्र रामसुमीरण यादव
३) टँकर क्र. एमएच-०४-अेएल-९२७१ चा मालक, राजबहादूर सिंग
४) एस.बी. रोडलाईन्स ट्रान्सपोर्ट कंपनीचे मालक
५) ब्री.ए.एस.एफ. कंपनीचे व्यवस्थापक
६) एच.पी.सी.एल. कंपनीतील विभागीय विक्री व्यवस्थापक श्री. डी. साईकुमार
(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, तुर्भे पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, तुर्भे पोलिस स्टेशन, नवीमुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.
२) मे. हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि., वाशी टर्मीनस, नवी मुंबई यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
३) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई. यांना माहितीसाठी अग्रेषित.
४) कार्यासन अधिकारी, दक्षता शाखा, का.क्र. ५, प्रधान कार्यालय, मुंबई यांना माहितीस्तव
५) निवड नस्ती.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.